पुरोगामी मराठवाडा

# मुंबई येथे डिसेंबरमध्ये औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे आयोजन

मुंबई, (पीएसआय) – हॅनोवर मिलानो फेअर्स इंडिया या कंपनीने यंदा मुंबईत 'मेगा इंडस्ट्रीयल ट्रेड फेअर' अर्थात औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे आयोजन केले आहे. दि. १० ते १३ डिसेंबरदरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगांव (पू) येथे आयोजित या महामेळाव्यात मटेरियल्स हँडलिंग इंडिया (प्रोसेस अ‍ॅण्ड प्रोडक्शन ऑटोमेशन अ‍ॅण्ड इंडस्ट्रीयल बिल्डिंग ऑटोमेशन), एनर्जी इंडिया ही चार प्रमुख प्रदर्शने भरवली जातील. अत्याधुनिक तंत्रज्ञान हे या महामेळाव्याचे प्रमुख आकर्षण आहे.

फ्लुईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियातर्फे या महामेळाव्यात ऑटोमेशन किऑस्क उभारण्यात येणार आहे. फ्लूईड पावर सोसायटी ऑफ इंडियाच्या सदस्य औद्योगिक संस्थांनी या महामेळाव्यात ऑटोमेशन तंत्रज्ञान आणि अ‍ॅप्लिकेशन ट्रेनिंगसंदर्भात माहिती देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ऑटोमेशन किऑस्क ही एक अनोखी संकल्पना असून, यापूर्वी जगात कुठेही या संकल्पनेचा वापर करण्यात आलेला नाही. याशिवाय, लेन्झ कंपनीत तयार केलेला ८४०० फ्रिक्वेन्सीचा नवीन इन्व्हर्टर, ओमाल कंपनीचे अ‍ॅक्यूएटर्स आणि व्हावल्स, पीटर्स इंडू प्रोडक्ट कंपनीचे न्यूमॅट्रिक, हायड्रॉलिक, सेन्सर अ‍ॅण्ड ऑटोमेशन प्रोडक्ट, केबल अ‍ॅडप्टर, सेन्सर कनेक्टर एम८–एम १२ कनेक्टर मोल्डेड, सेन्सर कनेक्टर एम–८, एम–१२ फील्ड अ‍ॅटेचेबल, इलेक्ट्रॉनिक प्रेशर स्विच इ. स्टॅबिलस, सेन्टॉर्क, अ‍ॅटॉस या कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित या महामेळाव्यात समावेश असेल. पुरवठादार आणि ग्राहक कंपन्या या दोहोंनाही उद्योग जगातल्या नवनवीन ट्रेंडसच्या माहितीची देवाण–घेवाण करण्याच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.